## Quadrant II- Notes

**Programme : B.Ed.**

**Subject : Education**

**Paper Code : EDU 07&08.**

**Paper Title : Methodology cum Content of Marathi**

**Unit : Unit/ घटक ५ : भाषिक मूल्यांकन**

**Module Name: सातत्यपूर्ण सर्वसमावेशक मूल्यांकन**

**Name of the Presenter: Mr.Sagar Machindra Davari.**

---

- महत्वाचे मुद्दे-

सातत्यपूर्ण सर्वसमावेशक मूल्यांकन (सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन) :

सातत्यपूर्ण मूल्यमापन –

सर्वंकष(सर्वसमावेशक) मूल्यमापन –

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तत्त्वे-

मूल्य निर्धारणाचे प्रकार-

**सातत्यपूर्ण सर्वसमावेशक मूल्यांकन / सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन :**

शालेय स्तरावर मूल्यमापन प्रक्रिया राबवली जाते. यामध्ये संख्यात्मक तसेच गुणात्मक साधनांचा वापर केला जातो. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती तपासली जाते. या मूल्यमापनाच्या वेगवेगळ्या पद्धती वापरल्या जातात त्यामधील एक म्हणजे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन ही पद्धत आहे. या पद्धतीद्वारा विद्यार्थ्याच्या एखाद्या वर्गात प्रवेश घेतल्यापासून संपूर्ण वर्षभर त्याच्या सर्वांगीण प्रगतीचे निरीक्षण करून त्यानुसार कार्यवाही केली जाते.

**सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन :**

या मूल्यमापनात सातत्यपूर्ण मूल्यमापन आणि सर्वंकष मूल्यमापन या दोन संकल्पनांचा समावेश होतो.

**(१)सातत्यपूर्ण मूल्यमापन –**

- "जे मूल्यमापन सतत चालू असते त्याला सातत्यपूर्ण मूल्यमापन म्हणतात."

- "कोणत्याही प्रकारच्या अध्यापनानंतर किंवा विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभूती दिल्यानंतर जे मूल्यमापन होते ते सातत्यपूर्ण मूल्यमापन होय."

- सातत्यपूर्ण मूल्यमापन हे घटक किंवा पाठ संपल्यावर केले जाणारे मूल्यमापन आहे. यामुळे शिक्षकाला पुढील नियोजनासाठी प्रत्याभरण मिळते.

- विद्यार्थ्यांची अध्ययन पातळी कळते.

- अध्ययनातील कच्चे दुवे कळतात त्यामुळे उपचारात्मक अध्यापन करता येते.

- सतत सुरू असल्यामुळे शैक्षणिक उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली हे समजते.

**२) सर्वंकष मूल्यमापन –**

- "सर्वंकष मूल्यमापन म्हणजे सर्वांगीण मूल्यमापन होय."

- "ज्या मूल्यमापनामध्ये विद्यार्थ्याचा बोधात्मक, भावनात्मक, क्रियात्मक आणि आंतरक्रियात्मक आढावा घेतला जातो त्यास सर्वंकष मूल्यमापन म्हणतात."

- हे मूल्यमापन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण पातळीचे मोजमाप करण्यासाठी असते.

- शाळेत बोधात्मक क्षेत्राकडे जास्त लक्ष दिले जाते परंतु त्या सोबत भावात्मक आणि क्रियात्मक क्षेत्रही महत्त्वाचे असते. त्यांचेही मोजमाप करणे अपेक्षित असते.

- तसेच विद्यार्थी समाजात वावरत असतो त्यामुळे त्याच्या विकासात सामाजिक आंतरक्रियाही महत्त्वाच्या भूमिका बजावतात.

म्हणून सर्व घटकांचे मूल्यमापन होण्यासाठी सर्वंकष मूल्यमापन आवश्यक आहे. सातत्यपूर्ण मूल्यमापन आणि सर्वंकष मूल्यमापन या दोन्ही मूल्यमापन पद्धती विद्यार्थ्यांच्या विकासाचे मोजमाप करण्यासाठी उपयुक्त आहेत.

- **सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तत्त्वे**

  १)लवचिकता

  २)कार्यात्मकता

  ३)उत्तरदायित्व

  ४)वेळेचे नियोजन

  ५)वस्तुनिष्ठता

या तत्त्वांचा विचार करून ही मूल्यमापनाची पद्धत राबवली जाते.यांचा थोडक्यात आढावा घेऊ,

**१)लवचिकता-**

दैनंदिन अध्ययन अध्यापनात संकलित व आकारीक चाचण्या, नैदाणिक चाचण्या व उपचारात्मक अध्यापन, अभ्यासपूरक कार्यक्रम या सर्वांचे आयोजन केलेले असते. त्यांच्या नोंदी ठेवाव्या लागतात. आवश्यकतेनुसार बदल करावे लागतात त्यामुळे लवचिकता असणे गरजेचे आहे.

**२)कार्यात्मकता**

प्राप्त परिस्थितीत सर्व कार्याची अंमलबजावणी करावी. उपलब्ध स्रोतांचा विचार करावा.

**३)उत्तरदायित्व-**

अध्ययन- अध्यापन शिस्तबद्ध करणे आणि सर्व कार्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे.

**४)वेळेचे नियोजन-**

हे मूल्यमापन वेळेत पूर्ण व्हावे म्हणून उपलब्ध कालावधीचा विचार करावा लागतो.

**५)वस्तुनिष्ठता-**

हे मूल्यमापन वस्तुनिष्ठ झाले पाहिजे. तरच शैक्षणिक बदलांचा निश्चित आढावा घेणे शक्य होईल.

अशा प्रकारे या काही तत्त्वांचा विचार ही पद्धती राबवताना करावा लागतो. त्यामुळे मूल्यमापन हे अधिकाधिक निर्दोष व्हायला मदत होते.

**मूल्य निर्धारणाचे प्रकार-**

१) आकारीक मूल्यनिर्धारण -

२) संकलित मूल्यनिर्धारण

**१)आकारीक मूल्यनिर्धारण (Formative Assessment)-**

- विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण विकासाची पातळी पाहण्यासाठी व त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे मोजमाप करण्यासाठी ही मूल्यनिर्धारण पद्धत वापरली जाते.

- विकास प्रक्रिया चालू असताना वेळोवेळी मूल्य ठरविणे, कार्यात आवश्यक बदल करून सर्वांगीण विकास करणे हा प्रमुख हेतू असतो.

- सातत्याने ही प्रक्रिया सुरू असल्यामुळे अध्यापनात व इतर कार्यात आवश्यक बदल करता येतात.

- विविध मूल्यमापनाच्या साधनांद्वारा हे मूल्यनिर्धारण केले जाते.

**२)संकलित मूल्यनिर्धारण ( Summative Assessment )-**

- संकलित मूल्यनिर्धारणाला अंतिम मूल्यनिर्धारण असेही म्हणतात.

- एखाद्या वर्षाच्या शेवटी किंवा सत्राच्या शेवटी केलेल्या मूल्यनिर्धारणास संकलित मूल्यनिर्धारण असे म्हणतात.

- एका विशिष्ट व दीर्घ टप्प्यावर हे मूल्यनिर्धारण केले जाते. यामध्ये फक्त अंतिम परीक्षांचा विचार न करता वर्षभरात घेतल्या जाणाऱ्या चाचण्या व परीक्षांच्या फलितांचा विचार केला जातो.

- पुढील वर्गात प्रवेश, अभ्यासक्रम पूर्ततेचे प्रमाणपत्र याद्वारे दिले जाते.

अशा पद्धतीने आकारीक व संकलित मूल्यनिर्धारण करून सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धत राबवली जाते. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास तपासता येतो.